
Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## November-2020








**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
**Dr.Dinesh W.Nichit**
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
**Dr.Sanjay J. Kothari**
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

# INDEX



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | शिवाजी—इस्लाम संबंध — प्रा. मंगेश वाहाणे | 1 |
| 2 | गोपीनाथराव मुंढे यांचे सामाजिक कार्य — **प्रा.झरेकर रमेश सोनू** | 5 |
| 3 | साने गुरूजींचे अनुवादित साहित्य — डॉ. जयश्री शास्त्री | 9 |
| 4 | भटक्या विमुक्तांच्या साहित्याची भाषा : विशेष संदर्भ 'पालावरचं जग' — प्रा. गणेश दिगंबर सावजी | 14 |
| 5 | धरण प्रभावित क्षेत्रातील विस्थापित कुटूंबाच्या समस्या — **संजय नामदेवराव तोरवणे / प्राचार्य.डॉ.डी.एस.पाटील** | 18 |
| 6 | स्त्री भ्रुणहत्या कारणे व उपाययोजना — सौ. किर्ती नितीन सांगळे | 22 |
| 7 | मानवाधिकार आणि आदिवासी समाज — प्रा.डॉ.उल्हास एन राठोड | 25 |
| 8 | राजे लखुजी जाधवराव कार्य व कर्तुत्व— एक समालोचन — रविंद्र शंकरराव फटींग | 30 |
| 9 | इक्कीसवीं सदी के महिला उपन्यासकारों के उपन्यासोंमें चित्रित नारी — डॉ.प्रमोद परदेशी | 36 |
| 10 | भारतातील बौद्धीक संपदा अधिकाराचे महत्व व फायदे : एक दृष्टीक्षेप संशोधक — प्रा. सचिन ग. कर्णेवार / डॉ. प्रशांत म. पुराणिक | 42 |
| 11 | युवावर्गातील फास्ट फुडचे वाढते आकर्षण : आरोग्याची एक भीषण समस्या — **प्रा. डॉ. सोनाली राजेश बन्सोड** | 46 |
| 12 | जागतिकीकरण आणि शिक्षण यांच्यातील तुलनात्मक अभ्यास — प्रा. डॉ. मंजुषा समर्थ | 50 |
| 13 | बहामनी सुलतान व नरसिंगदेव राय संघर्षातून हिंदू राज्य स्थापनेचे प्रयत्न — डॉ. गजेन्द्र बी. ढवळे | 54 |
| 14 | भारतीय राजनीति में भ्रष्टाचार: एक वास्तव — डॉ. आर. जी. बांबोळे | 58 |
| 15 | मंदोदरीबाई पाटीलयांचे जागृति वृत्तपत्रातील स्त्री सुधारणेविषयक विचार — प्रा. सचिन ज्ञानेश्वर मोरे | 63 |
| 16 | महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्यातील अनुसूचित जमाती मधील 'आंध' समुदायाची बोलीभाषा — प्रा. गणेश बंडूजी माघाडे | 66 |
| 17 | कोव्हिड - १९ मधील प्लाझ्मा दान आणि लोकभ्रम — **प्रा. कमलेश मानकर** | 74 |
| 18 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे आरोग्यासंबंधी विचारांची कोरोना काळामध्ये गरज — प्रा. डॉ. अनुराधा रा. मुळे | 79 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal. ISSN : 2278-9308
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 254 (A) November,2020

# बहामनी सुलतान व नरसिंगदेव राय संघर्षातून हिंदू राज्य स्थापनेचे प्रयत्न

डॉ. गजेन्द्र बी. ढवळे
इतिहास विभाग प्रमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा, जि. अमरावती

## प्रस्तावना

सुलतान फिरूजशहा हा न्यायी, उदार, धार्मिक आणि सत्प्रवृत्तीचा होता. तो कुराण्याच्या नकला करून द्रव्यार्तन करीत असे. आणि आपला उदरनिर्वह करी. परंतु तो हिंदूचा मत्सर करीत असावा हे वऱ्हाडातील हिंन्दू लोकांवर वारंवार झालेल्या संघर्षातून स्पष्ट होते. फिरूजशहाच्या काळात वऱ्हाडचा सुभेदार विजयनगरच्या स्वारीवर गेल्यामुळें वऱ्हाडांत अव्यवस्था झाली. सातपुडयाचे उत्तरेस बैतूलपासून [४] मैलावर खेरला म्हणून गोंड लोकांचे लहानसे राज्य होते. हे राजे आपणास राजपूत म्हणवित असत. त्यावेळी नरसिंगदेव नावाचा गोंड राजा राज्य करीत होता. त्याचे मुख्य ठीकाण खेरला असून त्याच्या राज्याच्या सीमा वऱ्हाडला लागून होत्या. गोंड लोक फारच काटक, धाडसी व शुर असून ते बहामणी साम्राज्याच्या वऱ्हाड प्रांतावर स्वाऱ्या करीत.[५] त्या मागचा उदेश हाच होता की एलिचपूर या ठिकाणी हिन्दूचे स्वतंत्र्य राज्य स्थापण व्हावे. कारण गोंड लोकाची वस्ती सभोवताली व सर्व सातपुडयाच्य डोंगरात होती. तो भाग वऱ्हाडच्या हद्दीत येत होता व देवगड, नागपूर, चांदा वगैरे ठिकाणी गोंडवणात त्यांची राज्यें होती. येथील राजे सतत वऱ्हाडवर स्वाऱ्या करीत असत.

## नरसिंगदेव रायाची वऱ्हाडवर स्वारी

अशातच नरसिंगदेव यानें वऱ्हाडचा सुभेदार सलाबत खान विजयनगरच्या संघर्षात गुंतलेला पाहून इ.स. १३९७ मध्ये वऱ्हाडवर स्वारी केल. आणि तेथे हिन्दूचे स्वातंत्र्य राज्याची प्रतिस्थापना केली. गाविलगड व नरनाळा किल्ल्यांवर ताबा मिळविला. हे तेथील वास्तूंचे निरीक्षण केल्यावर स्पष्ट होते. कारण बहूतांश ठीकाणी हिन्दू चिन्ह अंकीत केलेली आहेत. यावरून ऐलिचलपूर येथे हिन्दूचे स्वातंत्र्य अस्तित्व होते. हे सिद्ध होते. परंतु हे स्वातंत्र्य राज्य काहीकाळच अस्तित्वात राहू शकले. नरसिंगदेव राजाने लुटालूट करून सर्व वऱ्हाड आपल्या ताब्यांत घेतले.[१] व आपले अधिकारी नेमले. परंतु एवढा मोठा प्रांत पुढे ताब्यांत ठेवता येईल इतके मनुष्यबळ व द्रव्यबळ नरसिंगदेव राया जवळ नव्हते. याचा त्यांने विचार केला नाही. तरी त्याने हिंदु प्रजेचे स्वतंत्र्य राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला. असे म्हणावयास भरपूर वाव आहे. ही बातमी सुलतान फिरूजशहा बहामनी याला लागताच विजयनगरची मोहीम आटोपताच ताबडतोब ता हिजरी ८०२ इ.स. १३९९ मध्ये वऱ्हाडवर चालून आला. त्यावेळी माहूरवर नरसिंगदेवर राजाचे अधिपत्य होते. म्हणून माहूर परत घेऊन तो एलिचपुराकडे स्वतः गेला. व आपला भाऊ अहमदखान यास खेरल्यावर गोंड लोकांचा मोड करण्यास पाठविले व आपण एलिचपुरास राहिला.[२]

## खेरल्याची लढाई व नरसिंगदेवाचा विजय

नरसिंगदेव गोंडाने लष्कर घेऊन लढण्यास अहमदखानावर चालून आला व खेरल्यापासून जवळच त्यांची लढाई झाली. गोंड लोक फारच बहादुरीने लढले प्रथम नरसिंगदेवाचा जय होऊन त्यांनी मुसलमानाच्या सैन्याचा मध्यभाग फोडून शुजातखान, दिलावरखान, बहादूरखान, सलाबतखान हया मुसलमाननांचे मोठमोठे प्रसिध्द सरदार यांना ठार मारले. परंतु उजव्या बाजूला स्वतः अहमदखान व डावीकडून फजल–उल्ला–अंजू शिराझी नावाचा सरदार होता. त्या दोघांनी आपआपल्या बाजू कशाबशा थोपवून धरल्या. इतक्यांत सर्व लष्करावरील मुख्य अंमलदार अहमदखान मारल्या गेल्याची अफवा पसरली परंतु फझलउल्ला याने ही बातमी गुप्त ठेवली व दुसरी अफवा पसरविली की फिरूजशहा बहामनी सुलतान स्वतः मोठे लष्करासह मदतीस येऊन पोहोचला आहे. या बातमीचे पुष्टीकरणार्थ त्याने मोठमोठाले नगारे वाजविली याचा परिणाम असा झाला की, सैरावैरा पळत सुटलेले सर्व मुसलमान लष्कर परत एकत्र जमलें व अहमदखान व फजल–उल्ला हे एकत्र फळी मिळवून एकदम नरसिंगरायाच्या लष्करावर तुटून पडले.

**नरसिंगदेवाचा हुंशगशहावर विजय**

नरसिंगदेव राय हा खेरल्याचा हिंदूराजा असल्यामूळे त्याच्यावर माळव्याचा मूलतान याने दोन वेळा स्वाऱ्या केल्या. दोन्ही स्वारीत नरसिंगदेव रायाने हुशंगशहाचा पराभव केला होता. याचा सुड घेण्याकरीता हूशगशहाने तिसरी स्वारीत अचानकपणे नरसिंगराय यानेवर हल्ला केला. त्यामूळे सैन्याची जमवाजमव करणे अशक्या झाले हे पाहून त्याने असिरगड कील्ल्याचा आश्रय घेतला व महम्मदशहा वली सुलतानास मदत मागितली. तेव्हा त्याने खानजहान या एलिचपूरच्या सुभेदारास नरसिंगदेव रायाच्या मदतीकरीता कूच करण्याचे आदेश देऊन स्वतः खनजहानच्या मदतीसाठी ७ हजार घोडेस्वार घेऊन एलिचपूरला कूच केले.[८] माळव्याचा मुलतान हुंशगशहा याने असा अंदाज बांधला की सुलतान अहमद हा घाबरून जाऊन वऱ्हाडातील आपल्या सैन्यापासून दूर गेला आहे. म्हणून खेरल्यावर आक्रमण करून आजूबाजूचा प्रदेश उद्‌ध्वस्त करू लागला.[९]

या सूमारास मूस्लीम श्रद्धाळू लोकांनी अहमदशहास असे सांगितले की तूमच्या कोणत्याही पूर्वजानी मुस्लीमान विरूद्ध मदत केलेली नाही. हे करणे म्हणजे इस्लाम धर्माच्या मूल तत्वाविरूद्ध आहे. म्हणून अहमदशहा हा हुशंगशहास नरसिंगदेवराय हा आमचा मांडलीक आहे त्याला कोणतीही इजा होता कामा नये. हा निरोप देऊन मागारी फिरला. तेव्हा बहामनी सुलतान आपल्याला घाबरून निघून जात आहे हे पाहून हुशंगशहाने त्याचा पाठलाग केला. तव्हा अचानक पलटून अहमदशहा बहामनीने हुशंगशहावर हल्ला चढविला आणि त्याचा पुर्ण पराभव केला. या मोहिमेत यश संपादन करून आपल्या राजधानीत परत आला. त्याने गुलबर्ग्यावरून आपली राजधानी बिदर येथे स्थानांतरीत केली. आपला राजपुत्र महमूद खान याच्याकडे रामगीर, माहूर, कळंब आणि वऱ्हाडचा काही भाग इतका प्रदेश लावून दिला. दूसरा राजपुत्र दाऊदखान याला त्याने राजचिन्ह दिले तर अल्लाउद्दीन याला आपला वारस म्हणून जाहिर केले.

**अहमदशा बहामनी विरूध्द वऱ्हाडात प्रजेचे बंड**

अहमदशहा बहामनी सुलतान १४२५ मध्ये वऱ्हाडात एक वर्षभर राहिला. याच वेळेस त्यानें वऱ्हाडातील प्रसिध्द गाविलगड किल्ला दूरूस्ती करून काही भाग बांधला. त्यापुर्वी तेथे जुना लहाण किल्ला होता. विजयनगरच्या लढाईच्या गडबडीत बहामनी राजे गुंतल्यामुळे वऱ्हाडांत बरीच वर्षेपर्यत अंदाधुंदी चालली होती बहामनी राजांचे पूर्वीचें सहानुश्रूतीपर वर्तन नाहीसें होऊन राजांच्या अंगी हिदूंचा द्वेष आणि आपल्या धर्माचा अवाजवी अभिमान व पक्षपात सुरू झाल्यामूळे हिंदूचा छळ होऊ लागला. विजयनगरच्या वैभवशाली हिंदुराज्याचा व त्याचेशी सतत लढणाऱ्या बहामनी मुसलमानी राज्याचा हिंदुच्या मनावर परिणाम होऊ लागला त्यामुळें वऱ्हाडातील हिंदुनी वऱ्हाडातील लष्कर विजयनगरच्या स्वारीत गंतलेले पाहून ग्रामसंस्था व परगणे प्राचीन काळापासून हिंदुच्या स्वाधीन होते. म्हणून त्यांचे लोकांनवर वचक होता. त्या वतनदारांवर जुलूम झाल्यास प्रजा बंड करीत असे स्वतंत्र राज्य स्थापणेस योग्य संधी येत होती तेव्हा वऱ्हाडातील हिंदूस खेरल्याच्या नरसिंगदेव राजाचा मोठा आधार वाटत होता.[१०] त्याने वारंवार तसा प्रयत्नही केला. आणि पैनगंगेपर्यतचा वऱ्हाड काही काळ आपल्या अधिकारात घेतला होता असे दिसते. परंतु त्याचा जोर कमी पडून त्याला हार खावी लागत होती. अहमदशहाने प्रथम वऱ्हाडातील दक्षिण ठाणे माहूर हे काबीज केले. व उत्तरेकडे एलिचपूराकडे जाताना त्याने कळंब सर केलें. ही दोन्ही ठाणी त्यावेळी हिंदूच्या ताब्यात होती. वऱ्हाडच्या मूसलमानी सत्तेला खेरला येथील राजापासून विषेश भिती होती. हे पूर्वी आलेच आहे. शिवाय दक्षिणेत प्रवेश करताना सातपूडयाच्या पर्वत राजीतून यावे लागे म्हणून सातपूडयाचीच नाकेबंधी करणे हा अहमदशहाचा मुख्य हेतू होता म्हणूनच गाविलगड व नरनाळा या कील्ल्यांची दूरूस्ती करून घेतली.

**अल्लाउद्दीन शहा बहमनी दुसरा:–**

आपल्या वडिलांच्या इच्छेप्रमाणे अल्लउद्दीन शहा हा बिदर येथे सिंहासनावर बसला त्याने आपला भाऊ महमदखान याला जहागिरी दिली . अल्लाउद्दीन शहा यास खानदेशचा राजा नसीरखान याची मुलगी दिली होती. परंतु अल्लाउद्दीन ने संगमेश्वर येथील एका हिंदू राजाच्या मुलीशी लग्न लावले होते व तिचा तो अगदी अंकित झाला होता. त्यामुळे नासीरखानाच्या मुलीने आपल्या वडीलास आपल्या अन्याची कहानी पत्र पाठवून दिल्यामुळे नसिरखान अल्लउद्दीनवर चाल करून आला.[११] नसीरखान हा मुसलमानांचा दुसरा खलीफा उमर याचे आपण वंशज आहो असे म्हणवीत असे. त्यामुळे त्याचे सर्व मुसलमानांवर धार्मिक वजन होते. त्यामुळे वऱ्हाडातील सर्व मुसलमान सरदार, मेळघाटातील गोंड व कोरकू संस्थानीक नरसिंगदेवराय याना आपलेकडे वळवून घेतले.

नसीरखान बऱ्हानपूराहून सातपुडयांतू दक्षिणेस चालला वऱ्हाडचा सुभेदार खानजहान हा नरनाळयास होता त्यास सर्व फितुरी सरदारांनी कोंडून ठेवले खानजहान ने युक्तिने अल्लउद्दीन बादशहास निरोप पाठविला. बादशहाने दौलताबादचा सुभेदार खलफ हसन यास फौज देऊन पाठविले. खलफ हसन घाटावर मेहेकर येथ येऊन पोहचला खानजहान याने नरनाळा किल्ल्यातून सूटका करून तोही हसन यास येऊन मिळाला. तेथून त्यांनी काही दक्षिणी सैन्य बाळापूर व एलिचपुराकडे पाठविले.[१२] व मेळघाटांतील गोंड व कोरकू नरसिंगदेव गयाचे सैन्य आल्यास त्यास रस्त्यांत अडविण्यास सांगितले. मेळघाटातून खास वऱ्हाडातील सपाटीतून दक्षिणेकडील घाटावर येण्यास पूर्वी वऱ्हाडात ठराविक रस्ते असून व त्या रस्त्यांवर चांगल्या दगडी वेशी माऱ्याचे ठिकाणावर असून वेशीचे दरवाजे बंद करता येत असम याप्रमाणे उत्तरेकडून दक्षिणेवरून घाटावर कोठूनहि गेले तरी कोणती तरी वेस ओलांडावी लागे. रोहिणखेडच्या घाटात खलफ खानाने नसीरखानास गांठून त्याचा पुरा मोड केला. नसीरखान पळून खानदेशांत लळिंग येथील किल्ल्यात जाऊन राहिला. त्यास बाहेर काढून खलफखानाने पुन्हा त्याचा पराभव केला व बऱ्हानपूर सर्व संपत्ती घेऊन बेदरास परत गेला इ.स. १४३७. इ.स. १४५७ मध्ये अल्ला उदिन शहा मरण पावला.[१३]

**नित्कर्षः–** बहामनी सूलतान हिन्दूचा अतोनात छळ करीत व सतत होणाऱ्या अन्यायामूळे अल्ला उद्दीनच्या अखेरीस अनेक ठिकाणी बंडे घडून आली.[१२] आणि हिंदूराज्य स्थापणेचे नरसिंगदेव या खेरल्याच्या राजाने बरेच प्रयत्न केले. परंतू त्याला हवे तसे यश मिळाले नसले तरी हिंदूनी वऱ्हाडात आपली संस्कृती टिकून ठेवली. प्रजेची बंडे सूलतानाने ती मोडून काढली. खाजेखान महम्मद गवान हा प्रथम याच सूलतानाच्या लष्करात उदयास आला. त्याने वऱ्हाड प्रांताचे दोन भाग करून अचलपूर व माहूर असे प्रांत दोन बनविले.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. काळे या. मा., 'नागपूर प्रांताचा इतिहास', यादव माधव काळे. वकील, बुलडाणा, (वऱ्हाड), १९३४. पृ. क्र. ९
२. देशपांडे य. खू., एलिचपूर वऱ्हाडची जुनी राजधानी, पृ.क्र. ३८.
३. काळे या. मा., वऱ्हाडचा इतिहास, १९२४, पृ.क्र. ३८
४. काळे या. मा., नागपूर प्रांताचा इतिहास, उपरोक्त, १९३४, पृ.क्र.१०
५. यवतमाळ डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर, १९०८, पृ.क्र. १७. व
केतकर श्री. व्य., महाराष्ट्रीय ज्ञानकोष, वि.१७ पृ.क्र. (ब) ६३.
६. देशपांडे य. खू., एलिचपूर वऱ्हाडची जुनी राजधानी, पृ.क्र. ३९.
७. फेरिस्ता, खंड २, पृ. क्र. ३७६.
८. ठतपहहेए श्रणए भ्पेजवतल व तिपेम व जीम डीवउंकपंद चवूमत पद प्दकपं स्वदकवदए १९२९ए च्य छवण ३७५ए
९. कुंठे भ. ग., गुलशने इब्राहिमी, १९८२, पृ.क्र. १५४
१०. सरदेसाई गोवींद सखाराम , मुसलमानी रियासत, ,खंड १, संपा १९५९ पृ२०९
११. काळे या. मा. , वऱ्हाडचा इतिहास पृ. क्र. ९४.
१२. फेरिस्ता, खंड २, पृ. क्र. ३७६.
१३.सरदेसाई गोवींद सखाराम , मुसलमानी रियासत, ,खंड १, उपरोक्त, पृ २१५